# देगलूर महाविद्यालयात नवमतदारांचे करनवाल यांनी केले स्वागत

## राष्ट्रीय कर्तव्य म्हणून मतदान करण्याचे आवाहन

**देगलूर / प्रतिनिधी**

नांदेड लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांच्या संकल्पनेतून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल आणि मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्याकडे स्वीपची जबाबदारी देण्यात आली आहे. दि. १८ एप्रिल रोजी गुरुवारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी देगलूर महाविद्यालय देगलूर येथील नवमतदार युवक-युवतींशी संवाद साधला. सुदृढ लोकशाहीसाठी मतदान हा महत्त्वाचा घटक असून नव मतदारांनी याचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.



याप्रसंगी १४३ नवमतदारांचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. मतदारांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता राष्ट्रीय कार्य म्हणून मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले. निवडणुकीचे महत्त्व, मतदानाची जबाबदारी, युवा मतदारांचे कर्तव्य, निवडणूक प्रक्रिया आदीबाबत युवकांशी संवाद साधताना त्यांनी माहिती दिली. दरम्यान महात्मा गांधी पुतळा ते देगलूर तहसील कार्यालयापर्यंत मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. मानव विकास हायस्कूल, साधन हायस्कूल, देगलूर महाविद्यालयाचे विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यात सहभागी झाले होते. विविध घोषणांनी देगलूर शहर दुमदुमून केले होते. यावेळी मी मतदान करणारच या विषयाच्या काढलेल्या रांगोळीने सर्वांचे लक्ष वेधले होते. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या हस्ते 'मी मतदान करणार' या सेल्फी पॉईंटचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी सचिन गिरी, तहसीलदार राजाभाऊ कदम, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य उत्तमकुमार कांबळे, गट विकास अधिकारी शेखर देशमुख, गटशिक्षणाधिकारी तोटरे आदींची उपस्थिती होती.

माझं मत, माझी जबाबदारी मतदानाला नक्की या कारेगाव येथे मतदान पोलचिठ्ठीचे वाटप मतदारांना मतदार माहिती चिठ्ठी अर्थात पोलचीट वाटप करण्यात येते. या चिठ्ठीमध्ये मतदारांचे नाव, भाग क्रमांक, खोली क्रमांक आदी आवश्यक माहिती असते. देगलूर तालुक्यातील कारेगाव ग्रामपंचायत येथे गुरुवारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा स्वीपच्या प्रमुख मीनल करनवाल यांनी मतदारांना घरोघरी जाऊन पोलचीटचे वाटप केले. मतदान ही प्रत्येकाची जबाबदारी असून प्रत्येकाने दि.२६ एप्रिल रोजी मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी गावकऱ्यांना त्यांनी मतदानाची शपथ दिली.

याप्रसंगी गावकऱ्यांनी मतदान करणार असल्याचा निर्धार केला. मोफत सर्व्हीसिंग सोबत आता हिरो दुचाकी खरेदीवर एक हजाराची सूट देगलूर येथील हिरो सर्विसिंग व हिरो शोरूमचे मालक प्रमोद चौधरी यांनी मतदान करणाऱ्यांना दि.२६ ते ३० एप्रिल दरम्यान हिरो गाडी मोफत सर्व्हीसिंग करून देण्यात येणार असल्याचे जाहीर केले होते. गुरुवारी या शोरूमला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी भेट दिली.

Scanned with OKEN Scanner